गोंदिया नगरपरिषद, जि.गोंदिया येथे दि.१०.०३.१९९३ पूर्वीपासून कार्यरत पात्र रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.२१/नवि-१४,
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक. १५ नोव्हेंबर, २०१८

संदर्भ :- १. नगर विकास विभागाने पत्र क्र.नपाप्र-१०९९/९९/१५९/९८/नवि-१६, दि.०६.०५.२०००.
२.नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि-२७, दि.२८.०९.२०००.
३.नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे आदेश क्र.नप्रसंई १०२०/प्र.क्र.१३६/२००१/७, दि.२०.४.२००१.
४.नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.२१/नवि-१४, दि.०८.०२.२०१८.
५.नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा दि.२८.०८.२०१८ व दि.२९.०९.२०१८ चा प्रस्ताव.

प्रस्तावना: -

राज्यातील नगरपरिषदांमध्ये कार्यरत असलेल्या दि.१०-०३-१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याचा धोरणात्मक निर्णय संदर्भ क्र.१ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या संदर्भ क्र.३ येथील आदेशान्वये दि.१०.०३.१९९३ पूर्वीपासून रोजंदारीवर कार्यरत असलेल्या, कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याकरीता कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ७६ नुसार नगरपरिषद आस्थापनेवर पद निर्मितीचे अधिकार संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना आहेत. त्या नुसार, गोंदिया नगरपरिषद, जिल्हा गोंदिया येथे मंजूर आकृतीबंधाच्या व्यतिरिक्त कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याचा नगरपरिषदेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी शासनाच्या पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता.

गोंदिया नगरपरिषदेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यापैकी दि.१०.०३.१९९३ पूर्वीपासून कार्यरत कर्मचाऱ्यांना २४ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही नगरपरिषद आस्थापना खर्चाची अट पूर्ण करु शकत नसल्याने तसेच नगरपरिषद आस्थापनेवर मंजूर असलेले पदांपैकी आवश्यक संख्येने रिक्त पदे उपलब्ध नसल्याने, त्यांना शासन निकषानुसार नियमित सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. सदर कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली विनंती व संदर्भ क्र.१ अन्वये घेण्यात आलेला धोरणात्मक निर्णय विचारात घेवून, संचालनालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयानुसार गोंदिया नगरपरिषदेतील कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांपैकी वर्ग-३ चे ३७ व वर्ग-४ चे २३ कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यास मान्यता देण्यात आली होती. गोंदिया नगरपरिषदेतील समावेशन न झालेल्या उर्वरित कार्यरत रोजंदारी कर्मचाऱ्यांपैकी नियमित सेवेत सामावून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

गोंदिया नगरपरिषदेतील दि.१०.०३.१९९३ पूर्वीपासून कार्यरत व विहीत अर्हता पूर्ण करणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्यांमधील समावेशन न झालेल्या उर्वरित कर्मचाऱ्यांपैकी वर्ग-३ चे २४ व वर्ग-४ चे २३ कर्मचाऱ्यांचे खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मंजूर स्थायी रिक्त पदांवर सेवाज्येष्ठतेनुसार समावेशन करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे: -

<u>वर्ग ३-मधील पदांवर समावेशन</u>

जिल्हा	**नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नाव**	**समावेशन करावयाचे रोजंदारी कर्मचारी (लिपिक पदावर)**
नागपूर	मौदा	७
	महादुला	२
	खापा	२
	कामठी	१
	सावनेर	१
गडचिरोली	देसाईगंज	७
	एकुण	**२०**
गोंदिया	गोंदिया	**२**
	तिरोडा	**२**
	एकुण	**२४**

<u>वर्ग४- मधील पदांवर समावेशन</u>

जिल्हा	**नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नाव**	**समावेशन करावयाचे कर्मचारी (मुकादम/व्हॉलमन/शिपाई)**
नागपूर	मौदा	१
	महादुला	१
	खापा	१
	कळमेश्वर	१
	मोहपा	२
	काटोल	१
	मोवाड	२
	सावनेर	१
वर्धा	वर्धा	४
गडचिरोली	देसाईगंज	३
	गडचिरोली	२
चंद्रपूर	ब्रम्हपुरी	२
	एकुण	**२१**
गोंदिया	गोंदिया	**२**
	एकुण	**२३**

२. सदर समावेशनास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे: -

(१) शासन निर्णय दि.३०.११.२०१७ अन्वये मंजूर केल्यानुसार जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायतीतील उपलब्ध रिक्त पदांवर नवनिर्मित नगरपरिषद/ नगरपंचायतीतील कार्यरत तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समावेशनाची प्रक्रिया प्रथम पूर्ण करण्यात यावी.

(२) प्रस्तावित केलेल्या नगरपरिषद/ नगरपंचायतीमध्ये कार्यरत दि.११.०३.१९९३ ते दि.२७.०३.२००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी पदे उपलब्ध राहतील याची खात्री केल्यानंतर त्या पदांव्यतिरिक्त अन्य उपलब्ध पदांवर गोंदिया नगरपरिषदेमधील संबंधित कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यात यावे.

(३) गोंदिया नगरपरिषदेतील या कर्मचाऱ्यांचे अन्य नगरपरिषद/ नगरपंचायतीत समावेशन झाल्यानंतर सदर रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे गोंदिया नगरपरिषदेसाठी नव्याने पद मंजूर करण्यात येणार नाहीत.

३. संबंधित रोजंदारी कमर्चाऱ्यांचे समावेशन करण्याच्या दृष्टीने, एकवेळची विशेष बाब म्हणून केवळ या प्रकरणी नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि २७, दि.२८.०९.२००० अन्वये निश्चित करण्यात आलेल्या आस्थापना खर्चाच्या विहीत मर्यादेतून सूट देण्यात येत आहे.

४. संबंधित कर्मचाऱ्यांचे समावेशन करताना, त्यांच्या सेवा दि.१०.०३.१९९३ पूर्वीपासून सलग असल्याची खातरजमा करणे, वैद्यकीय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र या बाबी तपासण्यात याव्यात.

५. संबंधित रोजंदारी कर्मचाऱ्यांमधील पात्र रोजंदारी कर्मचाऱ्यांना सामावून घेताना सेवाजेष्ठतेनुसार नियमित सेवेत सामावून घेण्यात यावे.

६. संबंधित रोजंदारी कर्मचाऱ्यांचे समावशेन शासन धोरणानुसार व आदेशानुसार करण्यात येत असल्याने, संबंधित स्थानिक प्राधिकरणांच्या (नगरपरिषदांची) मान्यतेची आवश्यक नाही.

७. सदर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागीय आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास व सदर कर्मचाऱ्यांना इतर नगरपरिषदातील स्थायी रिक्त पदांवर नेमणूका देण्यासाठी अधिनियमातील कलम ७६(३) नुसार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवड प्राधिकारी म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने सदर संपूर्ण प्रक्रिया विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांचेमार्फत पूर्ण करून त्याबाबतचा एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१११५१६०८२६४९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sachin Dattatray Sahasrabuddhe

Digitally signed by Sachin Dattatray Sahasrabuddhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7db996f7c088dbf2d76ad85484362957aab596e46ec268eca3b9822aa62fd32b, serialNumber=67648ad8c40ecf8d0f911eaf72d918202f02f540836a5f65e8b71c0a69d61291, cn=Sachin Dattatray Sahasrabuddhe
Date: 2018.11.15 16:15:14 +05'30'

(सचिन द. सहस्त्रबुध्दे)
शासनाचे अवर सचिव

प्रत: -

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
६. संबंधित जिल्हाधिकारी
७. सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी(नवि-१८), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. निवडनस्ती (नवि-१४)